या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

पाटोदा
# संचार
PATODA SANCHAR

E-mail-pat.sanchar@gmail.com
संस्थापक संपादक- स्व.विश्वकर्मा डोळसे
संपादक-विलास डोळसे

आता एका क्लिकवर दै. संचार
लाईव्ह बातम्यांसाठी क्लीक करा
https://epaper.patodasanchar.com

❑ पाटोदा/बीड ❑ स्थापना वर्ष ३५ वे, वर्ष २० वे ❑ अंक ९६ वा ❑ मंगळवार दि.२० मे २०२५ ❑ पाने-४ किंमत १ रुपया ❑ पो.र.नं.एल/एसबी/बीड/रनंप-२२१/२०२५-२७ ❑ R.N.I. No.MAHMAR/46359
❑ PATODA/BEED ❑ YEAR 20 th ❑ Issu -96 ❑ Tuesday 20 May 2025 ❑ Page- 4 Price- Rs.1. ❑ Post.Reg.No.L/SB/Beed/RNP-221/ 2025-27 ❑ R.N.I. No.MAHMAR/46359

## कृषी कर्ज पुरवठ्यावरून मुख्यमंत्र्यांची बँकांना ताकीद

# शेतकऱ्यांना कर्जासाठी 'सिबिल स्कोअर'ची आवश्यकता नाही

### सन २०२५-२६ च्या ४४ लाख ७६ हजार ८०४ कोटींच्या पत पुरवठा आराखड्यास मंजुरी



**मुंबई । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना कृषी कर्जाचा पुरवठा झाला नाही तर त्याचे दुष्परिणाम अर्थव्यवस्थेसोबतच शेतकऱ्यांवरही होतात. त्यामुळे शेतकऱ्यांना सिबिल स्कोअर मागू नका. बँकांना यापूर्वीही यासंदर्भात सक्त ताकीद देण्यात आली आहे. यापूर्वी यासंदर्भात निर्देश न जुमानणाऱ्या बँकावर 'एफआयआर' देखील दाखल केले आहेत. रिझर्व्ह बँकेने सुद्धा कृषी कर्जाबाबत स्पष्टता दिली आहे. जर कोणती बँक शाखा सिबिल स्कोअर मागत असेल तर त्या शाखेवर कारवाई करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. तसेच कृषी कर्ज पुरवठा वाढवण्यासाठी राष्ट्रीयकृत बँकांनी विशेष प्रयत्न करून यंदाच्या वर्षी दिलेले उद्दिष्ट पूर्ण करावे, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.

राज्यस्तरीय बँकर्स समितीची १६७ वी बैठक सह्याद्री अतिथीगृह येथे झाली. यावेळी राज्याचा सन २०२५ -२६ या वित्तीय वर्षाचा ४४ लाख ७६ हजार ८०४ कोटी रुपयांचा पतपुरवठा आराखडाही बैठकीत मंजूर करण्यात आला.

**राष्ट्रीयकृत बँकांनी कृषी कर्ज पुरवठा वाढवण्यावर भर द्यावा**

महाराष्ट्र हे देशातील आघाडीचे राज्य असल्याचे सांगून मुख्यमंत्री मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शेतकरी हा राज्याचा कणा असून कृषी व्यवसाय हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा एक महत्वाचा भाग आहे. या भागाकडे दुर्लक्ष करणे योग्य नाही. त्यामुळे राष्ट्रीयकृत बँकांनी कृषी कर्ज पुरवठा वाढवण्यावर भर द्यावा. हवामान विभागाने यंदा चांगल्या पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर बँकांनी शेतकऱ्यांना अधिक सहकार्य करायला हवे. चांगला पाऊस झाला की कृषी विकासदर चांगला असतो. याचा लाभ बँकांनीही घ्यावा आणि शेतकऱ्यांनाही द्यावा. कृषी क्षेत्रामध्ये सध्या गुंतवणूक धोरण राबवण्यात येत आहे. त्यामध्ये बँकांची भूमिका महत्त्वाची असून त्यांनी या गुंतवणूकीमध्ये सहभागी व्हावे. कृषी क्षेत्रामध्ये किमान ५ हजार कोटी प्रतिवर्षी गुंतवणुकीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यामुळे या क्षेत्रामध्ये आता गुंतवणुकीला नवीन संधी उपलब्ध असणार आहेत. त्यामुळे बँकांनी शेतकऱ्यांना जास्तीतजास्त पतपुरवठा करावा. त्याचा बँकांना फायदाच होणार आहे. कृषी क्षेत्र आता फक्त सहाय्यक आणि पुनर्वसनात्मक असणार नाही तर एक व्यवसाय म्हणून त्याकडे पाहण्यात येईल. यामध्ये बँकांनी त्यांची भूमिका पार पाडावी. शेतकऱ्यांसाठी आणि या योजनांमध्ये चांगले काम करणाऱ्यांना सन्मानित करण्याचे धोरण ठरवावे. जेणेकरून आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा मिळेल. जे चांगले काम करणार नाहीत त्यांच्यावर कडक कारवाई करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले. पान दोन वर

## जिल्हा नियोजनाचा ५७५ कोटींचा आराखडा सादर

# बीडच्या विकासासाठी वाढीव निधी-उपमुख्यमंत्री अजित पवार



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हयाच्या विकासासाठी मी स्वत: अर्थमंत्री म्हणून अधिकाधिक निधी देत आहे अशी माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज दिली. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीनंतर ते पत्रकारांशी बोलत होते. आज झालेल्या बैठकीत जिल्हयाचा ५७५ कोटी रुपयांचा (सर्वसाधारण) आराखडा सादर करण्यात आला.

या बैठकीस पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने तसेच पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांची प्रमुख उपस्थिती होती.,

समिती प्रतिनिधींमध्ये आमदार विक्रम काळे, आमदार सतीश चव्हाण, आमदार सुरेश धस, आमदार प्रकाश सोळंके, आमदार धनंजय मुंडे आमदार नमिता मुंदडा, आमदार विजयसिंह पंडित आदींनी या बैठकीत सहभाग घेतला.

वर्ष २०२४-२५ चा आराखडा ४८४ कोटी रुपयांचा होता ही संपूर्ण रक्कम १०० टक्के खर्च झाली आहे. याचा आढावा देखील आजच्या बैठकीत घेण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पुढील वर्षीच्या प्रस्तावित आराखडयाबाबत सादरीकरण केले.

मागील बैठकीतील इतिवृत्तावर या बैठकीत चर्चा होवून त्यास मंजुरी देण्यात आली.

गुणवत्तापूर्ण कामे आणि पारदर्शी कामांवर भर द्या व दिलेली कामे वेळेत पूर्ण करा असे सांगून श्री पवार यावेळी म्हणाले की यापुढील काळात निधी जिल्हयाला थेट वर्ग न करता तो मुंबईहुन झालेल्या कामाच्या प्रमाणात जारी करण्याचे धोरण अंमलात आणले जाणार आहे.

गतवर्षी ४८४ कोटींचा आराखडा होता परंतू प्रत्याक्षात ४४६.३० कोटी इतका अंतिम आराखडा मंजूर झाला होता यात वर्ष २०२५-२६ करिता १२८ कोटी रुपयांची वाढ करुन तो ५७५ कोटींचा करण्यात आला आहे. २०२२-२३ च्या तुलनेत यंदाचा आराखडा दुप्पट आहे हे उल्लेखनीय.

नियोजन समितीमधील पान दोन वर

# स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयव रुग्णालयात आवश्यक सुविधा निर्मितीला प्राधान्य-उपमुख्यमंत्री अजित पवार




**अंबाजोगाई, । प्रतिनिधी**

येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय हे ग्रामीण भागात तालुक्याच्या ठिकाणी असलेले एक महत्वाची आरोग्य संस्था आहे. या संस्थेला ५० वर्षे पूर्ण होत असून याठिकाणी नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळण्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, पायाभूत सुविधा निर्मितीसाठी निधी दिला जाईल. या निधीतून प्राधान्यक्रम निश्चित करून आवश्यक सुविधा निर्मिती करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आज येथे दिले.

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात आयोजित आढावा बैठकीत उपमुख्यमंत्री श्री. पवार बोलत होते. पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, खासदार बजरंग सोनवणे, आमदार विक्रम काळे, आमदार धनंजय मुंडे, आमदार नमिता मुंदडा, माजी आमदार संजय दौंड, अक्षय मुंदडा, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, आरोग्य सहसंचालक डॉ. पान दोन वर

## मजूर संस्थेचे नूतनिकरण करण्यासाठी पाच हजारांची लाच घेणारा वरिष्ठ लिपिक जेरबंद

**बीड । प्रतिनिधी**

मजूर संस्थेचे नूतनिकरण करण्यासाठी पाच हजार रुपयांची लाच घेणाऱ्या सार्वजनिक बांधकाम विभाग क्र २ मधील वरिष्ठ लिपिकाला लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने जेरबंद केले. कृष्णा मुंडे असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.

बेलगाव येथील तक्रारदार यांच्या मजूर संस्थेचे नूतनिकरण करून अ वर्ग वर्गीकरण करण्यासाठी बीडच्या सार्वजनिक बांधकामं विभाग क्र २ मधील वरिष्ठ लिपिक कृष्णा वसुदेव मुंडे याने पाच हजार रुपये लाचेची मागणी केली.

याबाबत तक्रारदार यांनी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. त्यानंतर सापळा रचण्यात आला.मुंडे याला पाच हजाराची लाच घेताना कार्यालयात रंगेहाथ पकडण्यात आले.

## बीड मतदारसंघातील महत्वकांक्षी कामांना ना.अजित पवारांकडून सकारात्मक मंजुरी

### आ.संदीप क्षीरसागरांनी मानले बीड मतदारसंघाच्या वतीने आभार

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि.१९) रोजी झालेल्या नियोजन समितीच्या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड मतदारसंघाच्या विकासाच्या दृष्टीने महत्वाकांक्षी असलेले विविध विषय आणि विकासकामे ना.अजितदादा आणि समितीसमोर प्रस्तावित केली. त्यावर ना.अजितदादांनी प्रस्तावित केलेल्या विविध कामांना विकास निधी देण्यासाठी सकारात्मकता दर्शवत, निधी मंजूरीसाठी आदेशीत केले.



तसेच बीड मतदारसंघातील अनेक महत्वाच्या कामांना मंजुरी दिली. त्याबद्दल आ.संदीप क्षीरसागर यांनी ना.अजितदादांचे बीड विधानसभा मतदारसंघाच्या वतीने आभार मानले आहेत.

**या कामांना मिळाली मंजुरी**

बीडच्या विमानतळ उभारणी करता जिल्हाधिकारी कार्यालय, बीड यांनी जागेची तांत्रिक क्षमता तपासणी करता प्रस्ताव सादर केलेला आहे. लवकरच हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठीचा मार्ग मोकळा झाला आहे. पान दोन वर

# अजित पवारांचा राजीनामा मागणाऱ्या आंदोलनकर्त्यांना पोलिस प्रशासनाने उचलले

## टगेगिरी सहन करणार नाही-डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

मी एकेकाला सुतासारखं सरळ करीन अशा वल्गना करणा-या पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या बीड जिल्ह्यात टोळक्यांनी मारहाण करत व्हिडिओ प्रसारित करून दहशत निर्माण केली असुन कायदा व सुव्यवस्था बिघडली असुन ती राखण्यास पोलिस प्रशासन असमर्थ ठरत आहे.पोलिस प्रशासनाचा धाक राहिलेला नाही आणि पालकमंत्री अजित पवार यांचे पोलिस खात्यावर नियंत्रण नाही नसल्याने कायदा व सुव्यवस्था राखण्यास असमर्थ, पवनचक्की कंपन्यांकडून महसूल व पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने दडपशाही व खोटे खंडणीचे गुन्हे दाखल असताना शेतकऱ्यांना न्याय देण्यास असमर्थ उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री महाराष्ट्र राज्य असुन तिजोरीच्या चाव्या हातात असताना बीड जिल्ह्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना शासकीय मदत वेळेवर देण्यासाठी असमर्थ




तसेच बीड शहरातील नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा व्हावा यासाठी महावितरणचे थकीत ३३ कोटी रुपये वीजबिल नियोजन अथवा वित्त विभागातुन देण्यास असमर्थ तसेच बीड जिल्ह्यातील जलजीवन योजनेंतर्गत कामांसाठी २५० कोटी निधीची आवश्यकता असताना केवळ १४ कोटी रुपये मंजूर करून ग्रामीण भागातील पाणीटंचाई दूर करण्यास असमर्थ बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी बीडच्या पालकमंत्री पदाचा राजीनामा द्यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली माहिती आधिकार कार्यकर्ते शेख युनुस, शेख मुबीन, पांडुरंग हराळे, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले, आसाराम माने यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने निदर्शने करत असताना त्यांना पोलिस प्रशासनाने आंदोलन करत असताना पकडून पोलिसांच्या गाडीत टाकून शिवाजीनगर पोलिस स्टेशनमध्ये नेले आणि २ अडीच घंटे शिवाजीनगर पोलिस स्टेशनला बसवुन ठेऊन अजित पवार बीडमधून गेल्यानंतरच सोडून दिले.

### टगेगिरी बीड जिल्हा सहन करणार नाही; लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांची मुस्कटदाबी



दि.१९ सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करणार असल्याचे लेखी निवेदन जिल्हाधिकारी कार्यालय, पोलिस अधीक्षक कार्यालय आणि शिवाजीनगर पोलिस स्टेशन यांना देऊन त्यांची आवक जावक घेतलेली आहे. तशा दैनिकात बातम्या १७,१८ तारखेला प्रसिद्ध झाल्या आहेत. आंदोलनकर्ते यांनी आक्षेपार्ह घोषणाबाजी केली नाही तसेच काळे झेंडे दाखवले नाही , अजितदादांची गाडी अडवली नाही. केवळ ५ आंदोलनकर्ते लोकशाही मार्गाने आंदोलन करत होते. माझ्या मार्गदर्शनाखाली आंदोलन करण्यात येणार होते परंतु शुक्रवार पासुन ४ दिवस मी डॉ.आनिल बारकुल यांच्या दवाखान्यात आयसीयु मध्ये अडमिट आहे. मला दररोज रक्त चढवावे लागत असल्याने चक्कर येऊ शकते म्हणून आंदोलनास जाण्यासाठी परवानगी दिली नाही म्हणून मी आंदोलनात सहभागी नव्हतो. परंतु लोकशाही मार्गाने आंदोलन करणारांची पोलिस प्रशासनाकडून मुस्कटदाबी आणि अजितदादांची टगेगिरी बीड जिल्हा सहन करणार नाही अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे लिंबागणेकर यांनी दिली आहे.

संचार

## सरन्यायाधीश भूषण!

भारताचे ५२वे सरन्यायाधीश म्हणून भूषण रामकृष्ण गवई यांनी शपथ घेतली. राष्ट्रपती भवनात झालेल्या एका छोटेखानी समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी भूषण गवई यांना पदाची शपथ दिली. भूषण गवई हे सरन्यायाधीशपदी विराजमान होणारे दुसरी मागासवर्ग समाजातील मान्यवर आहेत. यापूर्वी, २००७ साली सरन्यायाधीशपद भूषवलेले के. जी. बाळकृष्णन हेही याच समाजातील होते. बाळकृष्णन यांनी तीन वर्षे सरन्यायाधीशपद भूषवले होते. याशिवाय, भूषण गवई हे सहावी मराठी व्यक्ती ठरले आहेत. न्या. यशवंत चंद्रचूड, न्या. शरद बोबडे, न्या. प्रल्हाद बालाचार्य गजेंद्रगडकर, न्या. उदय उमेश लळित आणि न्या. धनंजय चंद्रचूड यांच्यापाठोपाठ भूषण गवई सरन्यायाधीश झाले आहेत.

केरळ आणि बिहारचे माजी राज्यपाल तसेच रिपब्लिकन पक्षाचे ज्येष्ठ नेते रा. सू. गवई यांचे सुपुत्र असलेल्या भूषण गवई यांचा जन्म २४ नोव्हेंबर १९६० रोजी अमरावती जिल्ह्यात झाला. मुंबईतून कायद्याची पदवी घेतल्यानंतर १६ मार्च १९८५ रोजी ते बार कौन्सिलचे सदस्य झाले. १९८७ पर्यंत त्यांनी माजी महाधिवक्ता आणि उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती दिवंगत बॅरिस्टर राजा एस. भोसले यांच्यासोबत त्यांनी काम केले. १९८७ ते १९९० या कालावधीत त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात स्वतंत्रपणे वकिली केली. १९९० नंतर त्यांनी प्रामुख्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठासाठी वकिली केली. त्यांनी संवैधानिक कायदा आणि प्रशासकीय कायदा या विषयांत प्रॅक्टिस केली. ते नागपूर महानगरपालिका, अमरावती महानगरपालिका आणि अमरावती विद्यापीठाचे अधिकृत वकील होते. यानंतर वकील भूषण गवई यांनी ऑगस्ट १९९२ ते जुलै १९९३ या काळात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात सहाय्यक सरकारी वकील आणि अतिरिक्त सरकारी वकील म्हणून काम पाहिले. १७ जानेवारी २००० रोजी त्यांची नागपूर खंडपीठात सरकारी वकील आणि सरकारी अधिवक्ता म्हणून नियुक्ती झाली. तर १४ नोव्हेंबर २००३ रोजी त्यांना मुंबई उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायमूर्ती म्हणून पदोन्नती मिळाली आणि १२ नोव्हेंबर २००५ रोजी त्यांची मुंबई उच्च न्यायालयाचे कायमस्वरूपी न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती झाली. २४ मे २०१९ रोजी त्यांना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती म्हणून पदोन्नती मिळाली.

उत्तर प्रदेशातील आरोपींच्या घरांवरील बुलडोझर कारवाईबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करत योगी आदित्यनाथ सरकारले फटकारले होते. याशिवाय, मोफत योजनांबद्दलही त्यांनी जाहीर नाराजी व्यक्त केली आहे. मोफत मिळत असलेल्या सुविधांमुळे लोक काम करण्यास तयार नाहीत. त्यांना मोफत रेशन मिळते, त्यांना कोणतेही काम न करता पैसे मिळतात, असे निरीक्षण त्यांनी नोंदवले आहे. याशिवाय, पुण्यातील एका जमीन प्रकरणाच्या सुनावणीत लाडकी बहीणसारख्या मोफत योजना बंद करण्याचा इशारा महायुती सरकारला दिला होता.

आतापर्यंतच्या त्यांच्या रोखठोक आणि स्पष्ट भूमिकेमुळे विरोधकांना, विशेषत: शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष तसेच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्षांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत. याआधीचे सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्यासमोर सत्तासंघर्षाची सुनावणी झाली. निकाल देताना तत्कालीन सरन्यायाधीश चंद्रचूड यांनी निकालात ठाकरे गटाच्या दृष्टीने सकारात्मक निरीक्षणे नोंदवली होती. पण प्रत्यक्ष निकाल मात्र ठाकरे गटाला अपेक्षित नव्हता. त्यामुळे याबाबत संताप व्यक्त करत, महाराष्ट्रामध्ये घटनाबाह्य सरकारला सुप्रीम कोर्टाने संरक्षण दिल्याचा आरोपही ठाकरे गटाकडून करण्यात आला.

भूषण गवई यांची साधी राहणी लक्ष वेधून घेणारी आहे. नवीन सरन्यायाधीश भूषण गवई यांच्याकडून योग्य आणि योग्यवेळी न्यायदानाची अपेक्षा आहे. आतापर्यंतची त्यांची कारकीर्द पाहता, परखड निरीक्षण नोंदवतानाच, संतुलित न्यायदान केले आहे. रामशास्त्री बाण्याच्या भूषण गवई यांनी सर्वोच्च न्यायालयात काही नवे पायंडे पाडताना, जनहित याचिकांच्या सुनावणीसाठी आठवड्यातून एक दिवस निश्चित केला.

# ‘चटपटीत’ धोक्याचा घंटानाद

मनुष्यप्राणी ज्या परिसरात वास्तव्य करतो त्या-त्या भागात पिकणार्या अन्नपदार्थांचे सेवन केल्यास पंचमहाभूतांनी बनलेल्या शरीराला ते अनुकूल ठरते. मात्र चटपटीत खाणे धोक्यादायक ठरत आहे.

पिझ्झा, सॉफ्टड्रिंक, वेफर्स, सिझलर्स, बर्गर, सँडविच, चीज, नूडल्स, मोमोज, फ्रोजन फूड, कुकीज, केक यांसारख्या चटपटीत पदार्थांच्या विळख्यात आपली बाल व तरुणपिढी गुरफटत आहे. यामध्ये अतिप्रक्रियायुक्त अन्न म्हणजेच अल्ट्राप्रोसेससड् फूडचा समावेश अधिक आहे. अलीकडील काळात या संकल्पनेने आरोग्यविषयक चर्चांमध्ये महत्त्वाचे स्थान मिळवले आहे. हे अन्नपदार्थ पारंपरिक कृतीने प्रक्रिया केलेले नसतात, तर त्यामध्ये अनेक रासायनिक घटक, कृत्रिम चवद्रव्ये, प्रिझर्व्हेटिव्हज, रंग, वास वाढवणारे पदार्थ आणि इतर कृत्रिम घटक मिसळलेले असतात.



या पदार्थांची चटकदार चव, त्यांची रचना आणि आकर्षक रंग-सजावट यामुळे हे अन्नपदार्थ अधिकाधिक आकर्षित ठरत गेले. पण त्यामागील आरोग्यविघातक परिणामांचा आपण विचारच केला नाही. आज हे भारतातच घडते आहे असे नाही तर जगभरातील विकसित व विकसनशील देशांमध्ये अल्ट्राप्रोसेसड फूडचा वापर मर्यादेबाहेर गेला आहे. युरोप आणि अमेरिका या देशांमध्ये तर हे अन्न त्यांच्या एकूण आहारातील ५०६० टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. भारतातही शहरी भागात झपाट्याने वाढणार्या फ्वास्ट फ्वूड, पॅकेज्ड स्नॅक्स, बेकरी पदार्थ, सॉफ्ट ड्रिंक्स इत्यादींचा खप दिवसागणिक वाढत चालला आहे.

भारतात इंडियन काउन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च (आयसीएमआर) आणि नॅशनल इन्स्टिट्युट ऑफ न्युट्रिशन यांच्या २०२१ च्या संयुक्त अभ्यासानुसार, शहरी भागातील १५ ते ४५ वयोगटातील व्यक्तींमध्ये अतिप्रक्रियायुक्त अन्नसेवनाची सरासरी त्यांच्या आहाराच्या ३० टक्क्यांपेक्षा अधिक असल्याचे आढळले होते. विशेषतः किशोरवयीन आणि तरुण वर्ग या अन्नाच्या मोहात अधिक अडकतो आहे. कारण या पदार्थांची सहज उपलब्धता आणि प्रसिद्धीचे प्रभावी तंत्र.

तथापि, ‘लान्सेट’ या सुप्रसिद्ध आरोग्य जर्नलमध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, अतिप्रक्रियायुक्त अन्नाचे नियमित सेवन करणार्या व्यक्तींमध्ये हृदयरोग, टाईप-२ मधुमेह, स्थूलपणा आणि काही प्रकारच्या कर्करोगांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढते. अलीकडेच अमेरिकन जर्नल ऑफ्व प्रिव्हेंटिव्ह मेडिसिनमध्ये प्रकाशित झालेल्या एका ताज्या अहवालात याबाबत पुन्हा एकदा इशारा देण्यात आला आहे. अल्ट्रा-प्रोसेस्ड अन्नाचे दीर्घकाळ सेवन आरोग्यासाठी प्राणघातक ठरू शकते, असे हा अहवाल सांगतो.

ब्राझीलमधील एका विद्यापीठाच्या शास्त्रज्ञांनी आठ देशांतील सुमारे अडीच लाख लोकांवर केलेल्या अभ्यासात हे धक्कादायक निष्कर्ष समोर आले आहेत. ज्या भागांमध्ये अशा अन्नपदार्थांचे सेवन कमी होते, तिथे जीवनशैली अधिक दर्जेदार आणि आयुष्यमान किंवा वयोमर्यादा अधिक असल्याचे आढळले. याउलट ज्या लोकांनी अल्ट्रा-प्रोसेस्ड अन्नाचे नियमित सेवन केले, त्यांना पचनाच्या तक्रारी, लठ्ठपणा, हृदयविकार, मधुमेह, आणि मानसिक आजारांचाही अधिक धोका असल्याचे आढळले.

या अन्नपदार्थांचा प्रसार इतका वाढला आहे की आता ते आर्थिक विकासाच्या केंद्रस्थानी पोहचले आहेत. इंडियन कौन्सिल फ्वॉर रिसर्च ऑन इंटरनॅशनल इकॉनॉमिक रिलेशन्सच्या एका अहवालानुसार, भारतात २०११ मध्ये अल्ट्रा-प्रोसेस्ड अन्नाचा बाजार ७२३ कोटी रुपये होता. २०२१ पर्यंत तो २५३५ कोटींपर्यंत वाढला आणि मागील आर्थिक वर्षात हा आकडा ६००० कोटींच्या पुढे गेला आहे. वास्तविक पाहता, भारत सरकारच्या आर्थिक सर्वेक्षण २०२४-२५ मध्येही या चिंतेचा उल्लेख आहे. या सर्वेक्षणात म्हटले आहे की, जास्त साखर, मीठ, आणि घातक फॅट असलेले व पोषणमूल्यांचा अभाव असणारे अल्ट्रा-प्रोसेस्ड अन्न भारतात अनेक जीर्ण आजार आणि मानसिक आरोग्यसमस्यांना कारणीभूत ठरत आहे.

गेल्या पाच-दहा वर्षांत अनेक अहवालांनी ही बाब निदर्शनास आणून दिली आहे. पण सध्याच्या वेगवान जीवनशैलीमध्ये आणि मॉडर्न राहण्याच्या भ्रामक अट्टाहासामध्ये केक, कुकीज, चॉकलेट्स, पॅकेज्ड स्नॅक्स आणि आईसक्रीम यांसारखे अल्ट्रा-प्रोसेस्ड पदार्थ खाण्याची जणू टूमच आली आहे. जिव्हातृप्ती, वेळेची बचत आणि सहज उपलब्धता या तीन गोष्टींमुळे हे अन्न ‘आधुनिक जीवनशैलीचे प्रतीक’ बनले आहे. महानगरांमध्ये राहणारी तरुणाई तर सातत्याने या पदार्थांचे सेवन करत असते. ग्रामीण भागात, निमशहरी भागात तसेच मध्यमविकसित शहरांमध्येही विविध माध्यमांतून असे पदार्थ विक्रीस सहजगत्या उपलब्ध होतात. या पदार्थांचे आकर्षक रॅपर आणि प्रचंड मीठ व अन्य घटकांचा वापर करुन चटपटीतपणा आणलेले हे पदार्थ लहान मुलांना, तरुणांना अधिक रुचकर वाटतात.

पण प्रत्यक्षात ते आरोग्यासाठी सापळा ठरत आहेत. भारतासारख्या कृषिप्रधान आणि युवा देशात ही बाब अधिक गंभीर बनली आहे. विशेषतः तरुण पिढीमध्ये या अन्नपदार्थांचे आकर्षण इतके वाढले आहे की त्यांच्या दिवसभराच्या आहाराची सुरुवात आणि शेवट हे या पदार्थांशिवाय होतच नाहीत. या अन्नपदार्थांमध्ये हाय फ्व्रुक्टोज कॉर्न सिरप, हायड्रोजनेटेड फ्वॅट्स (ट्रान्स फ्वॅट्स), मोनोसोडियम ग्लुटामेट , कृत्रिम रंग व चव वाढवणारे पदार्थ हे सर्वच शरीरासाठी हानिकारक आहेत. हे पदार्थ आपल्या नैसर्गिक भूक नियंत्रण प्रक्रियेला गोंधळात टाकतात. परिणामी शरीराची गरज नसतानाही अधिक प्रमाणात अन्नसेवनास प्रवृत्त करतात. यामुळे स्थूलपणा, लिव्हर फ्वॅटी डीसिज, इन्सुलिन प्रतिरोधन, हायपरटेन्शन यांसारख्या समस्यांना निमंत्रण मिळत आहे.

याव्यतिरिक्त, मानसिक आरोग्यावरही या अन्नाचा परिणाम होतो. बीएमजे ग्लोबल हेल्थ’ अंतर्गत एकूण १० वेगवेगळ्या देशांमधील ९०,००० लोकांवर केलेल्या एका अभ्यासात दिसून आले की अतिप्रक्रियायुक्त अन्नाचं नियमित सेवन करणार्यांमध्ये डिप्रेशन आणि चिंतेच्या तक्रारी तुलनात्मक दृष्ट्या अधिक आढळतात. यामागे आहारातील पोषक घटकांची कमतरता आणि कृत्रिम पदार्थांचा मेंदूवर होणारा परिणाम हे मुख्य कारण मानले जाते. जागतिक आरोग्य संघटना आणि संयुक्त राष्ट्रांची अन्न आणि कृषी संघटन यांनीही अलिकडच्या अहवालांमध्ये अतिप्रक्रियायुक्त अन्नाविषयी धोका व्यक्त केला आहे.

त्यांनी सरकारांना सल्ला दिला आहे की अशा अन्नपदार्थांवर अचूक लेबलिंग, जाहिरातींवर नियंत्रण, शालेय परिसरात विक्रीवर बंदी आणि आरोग्यशिक्षणाच्या माध्यमातून जनजागृती करणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु यासाठी केवळ सरकार किंवा तज्ज्ञांची जबाबदारी पुरेशी नाही. पालक, शिक्षक, आरोग्यसेवक आणि सामान्य जनतेनेही आपल्या अन्ननिवडीबाबत सजग राहण्याची गरज आहे. अन्न हे केवळ पोट भरण्यासाठी नसून आरोग्य टिकवण्याचे मूलभूत साधन आहे, हे लक्षात घेऊनच आपण आपल्या आणि पुढच्या पिढीच्या आरोग्याची दिशा ठरवू शकतो. खरे पाहता, भारत सरकारने भरडधान्य म्हणजेच मिलेट्स, पारंपरिक अन्नपदार्थ व स्थानिक आहार यांना प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली आहे.


**- मंजिरी फडके**

# भारताने ३ दिवसात पकडले ११ पाकिस्तानी हेर

**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

२२ एप्रिल रोजी झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर हेरगिरीच्या कारवायांमध्ये सहभागी असलेल्यांवर देशभरात कारवाई सुरू असताना , तीन दिवसांत, अनेक राज्यांमध्ये पाकिस्तानसाठी हेरगिरी करण्याच्या आरोपाखाली ११ जणांना अटक करण्यात आली आहे . भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेबद्दल आणि लष्कराबद्दलची संवेदनशील माहिती पाकिस्तानी कार्यकर्त्यांना दिल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी रंगेहाथ पकडलेल्या ११ जणांमध्ये एक युट्यूबर, सुरक्षा रक्षक आणि एक ॲप डेव्हलपर यांचा समावेश आहे. सर्वात प्रमुख अटक झालेल्यांमध्ये हरियाणातील ट्रॅव्हल व्लॉगर ज्योती मल्होत्रा होती, जिला संवेदनशील माहिती लीक केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. अटक केलेल्या इतर आरोपींमध्ये विद्यार्थी, एक सुरक्षा रक्षक, सामान्य नागरिक आणि एक ॲप डेव्हलपर यांचा समावेश आहे.

सोशल मीडिया, आर्थिक प्रोत्साहने, खोटी आश्वासने, मेसेजिंग ॲप्स आणि पाकिस्तानला वैयक्तिक भेटी देऊन आरोपींना गुप्तचर



नेटवर्कमध्ये आकर्षित करण्यात आले. या नेटवर्क्समध्ये २० आणि ३० च्या दशकातील सोशल मीडिया प्रभावशाली आणि तरुणांचा वापर हेरगिरीच्या विकसित स्वरूपावर देखील प्रकाश टाकतो, जिथे गुप्तचर माहिती गोळा करण्यासाठी निरुपद्रवी वाटणाऱ्या माध्यमांचा वापर केला जाऊ शकतो. सर्व ११ अटक तीन राज्यांमध्ये झाली - हरियाणा, पंजाब आणि उत्तर प्रदेश. पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली आतापर्यंत अटक केलेल्या आरोपींची यादी येथे आहे.

ज्योती मल्होत्रा सोबत, पोलिसांनी गजाला, एक ३२ वर्षीय विधवा महिला आणि पंजाबमधील मालेरकोटला येथील यामीन मोहम्मद यांनाही पैशाच्या बदल्यात पाकिस्तानी एजंट्सना माहिती शेअर केल्याच्या आरोपाखाली अटक केली. आरोपीने पाकिस्तानी उच्चायोगाचे माजी कर्मचारी दानिशसोबत आर्थिक व्यवहार आणि व्हिसा-संबंधित कामांमध्ये सहकार्य केले. त्यांच्या अटकेनंतर, असे उघड झाले की दानिश त्यांना वारंवार भेटत असे. ते पाकिस्तानी व्हिसा मिळविण्यासाठी त्याच्याकडे संपर्क साधत असत. शिवाय, त्याच्यामार्फत त्यांच्या मोबाईल फोनवर ऑनलाइन पैसे ट्रान्सफर केले जात होते. त्यांचे काम त्यांच्या हेरगिरी नेटवर्कमध्ये पैसे पोहोचवणे होते.

## पान १ वरुन

### शेतकऱ्यांना सिबिल स्कोअरची अट

**पर्यटन, सेवाक्षेत्र आणि स्टार्ट-अप्सवरही बँकांनी लक्ष केंद्रित करावे**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्राने अर्धा ट्रिलीयन अर्थव्यवस्थेचा टप्पा पार केला असून एक ट्रिलीयन अर्थव्यवस्था होण्याकडे वेगाने वाटचाल सुरू आहे. एक ट्रिलीयन अर्थव्यवस्था होण्यामध्ये बँकांची भूमिका महत्वाची आहे. थेट परकीय गुंतवणुकीमध्ये महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. दावोसमधून राज्यात १६ लाख कोटींची थेट गुंतवणूक आली आहे. महाराष्ट्र आता स्टार्टअप्सची राजधानी आहे. या क्षेत्राकडे ही बँकांनी लक्ष द्यावे. त्यातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती होणार आहे. ‘एमएसएमई’मध्येही राज्य प्रथम क्रमांकावर असून त्यामध्ये गुंतवणुकीस चांगल्या संधी आहेत. बँकांनी आणि शासनाने मिळून ‘एमएसएमई’च्या केंद्र आणि राज्याच्या योजनांचा लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी एकत्र प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यामुळे राज्यासह देशाची अर्थव्यवस्था मजबूत होण्यास मदत होणार आहे. तसेच पर्यटन, सेवा क्षेत्र यावर बँकांनी प्रथमिकतेने लक्ष केंद्रीत करावे असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

**बँकांनी त्यांचे प्राधान्यक्रम सरकारच्या सोबतीने ठरवल्यास समग्र विकास**

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ऋझज महाराष्ट्रात मोठ्या संख्येने आहेत. कृषी क्षेत्राच्या विकासामध्ये ते महत्वाची भूमिका बजावू शकतात. बँकानी गडचिरोलीवर अधिक लक्ष केंद्रीत करावे. त्या ठिकाणी उद्योगांचे जाळे तयार होते आहे. या विकासामध्ये बँकांनी योगदान द्यावे. बँकांनी त्यांचे प्राधान्यक्रम सरकारच्या सोबतीने ठरवल्यास समग्र विकास होईल. केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना अंमलात आणणे ही बँकाची सुद्धा जबाबदारी आहे. त्यातूनच आर्थिक सर्वसमावेशकता साधली जाईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

**कृषि कर्ज पुरवठ्याचे १०० टक्के उद्दिष्ट पूर्ण करावे - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, कृषी कर्ज पुरवठ्याचा विषय बँकांनी गांभीर्याने घ्यावा. तसेच कृषी कर्ज पुरवठ्याचे १०० टक्के उद्दीष्ट पूर्ण करावे. उद्योजकांना विशेषतः महिला उद्योजकांना बँकांनी सहकार्य करावे. महामुंबई क्षेत्रातही कर्ज पुरवठा वाढवण्यावर भर द्यावा. या क्षेत्रात विकासाच्या मोठ्या संधी असल्याचेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

बैठकीस मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खरगे, सचिव डॉ. श्रीकर परदेशी राज्यस्तरीय बँकर्स समितीचे अध्यक्ष आदेश पांडे, सर्व विभागांचे सचिव, वरिष्ठ अधिकारी आणि राज्यस्तरीय बँकर्स समितीचे सदस्य आणि विविध बँकांचे अधिकारी उपस्थित होते.

### बीडच्या विकासासाठी वाढीव निधी–

कोणतेही काम १५ लाख रुपयांपेक्ष कमी असू नये तसेच कामाचे तुकडे पाडण्यात येवू नयेत प्रस्तावित जागेची मालकी तसेच त्याचे अक्षांश-रेखांश प्रस्तावित सामिल हवे अशा अटी यावर्षी घालण्यात आलेल्या आहेत.

कामाच्या ठिकाणी कामाच्या माहितीचे फलक अनिवार्य करण्यात आले असून कामांना प्रशासकीय मंजूरी प्रदान झाल्यावर १५ दिवसात त्याची निविदा प्रक्रिया करणे आवश्यक असेल अशा सर्वसाधारण सूचना नियोजन विभागाने यावर्षी जारी केल्या आहे.

वर्ष २०२५-२६ साठी ग्रामीण विकास अंतर्गत जनसूविधा व नागरी विकास २१ कोटी, जिल्हा आरोग्य अधिकारी १८.२ कोटी, जिल्हा शल्य चिकित्सक २८.५० कोटी, स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय २० कोटी, प्राथमिक शिक्षण २८. ५० कोटी, जलसंधारण ३६ कोटी, महिला व बाल कल्याण १८. ३९ कोटी, ग्रामीण रस्ते १०५ कोटी रुपये आदीप्रमाणे नियोजन आहे.

पशुधन विकासासाठी २२.२८ कोटींचा आराखडा आहे सोबतच राज्य शासन, सी.एस.आर. आणि नियोजन निधिमधून वेगळा दुधोत्पादन अर्थात धवल क्रांती योजना राबविण्याचा प्रस्ताव पशुधन विकास तथा पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिला. तो या बैठकीत स्विकारण्यात आला.

यासोबत नागरी क्षेत्र विकास ६३. ६६ कोटी, उर्जा विकास ३१ कोटी, पोलीस व तुरुंग आस्थापना १६.३५ कोटी, महसूल व आपत्ती व्यवस्थापन ७. ४३ कोटी, क्रींडागण विकास ४.२० कोटी रुपय असे नियोजन या आराखडयात आहे.

### स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय

शिल्पा दमकुंडवार, महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बी. एम. थोरात यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालयामध्ये पदवीपूर्व विद्यार्थी क्षमता १५० इतकी असून या प्रवेश क्षमतेसाठी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने (एनएमसी) निश्चित केलेल्या नियमानुसार आवश्यक पायाभूत सुविधा, मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी लवकरच वैद्यकीय शिक्षण विभाग आणि वित्त विभागाच्या संयुक्त बैठकीचे आयोजन करण्यात येईल. तसेच आवश्यक कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल. या निधीतून करावयाच्या कामांचा प्राधान्यक्रम ठरवून त्यानुसार आराखडा तयार करावा. पायभूत सुविधांची निर्मिती करताना उपलब्ध जागेचा पुरेपूर आणि योग्य वापर होण्यासाठी तज्ज्ञ आर्किटेक्टची नेमणूक करावी. महाविद्यालयाच्या जमिनीवर झालेले अतिक्रमण हटवावे, तसेच पुन्हा अतिक्रमण होवू नये, यासाठी संपूर्ण परिसराला सुरक्षा भिंत बांधण्याच्या सूचना उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी दिल्या.

ग्रामीण भागातील नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यासाठी शासनाकडून प्राप्त होणाऱ्या निधीचा अत्यावश्यक आणि दर्जेदार कामासाठी विनियोग करावा. औषधांच्या बाबतीत कोणत्याही तक्रारी येवू नयेत, याची काळजी घ्यावी. सध्या सुरू असलेली बाह्यरुग्ण विभाग, मुलांचे वसतिगृह आणि मुलींच्या वसतिगृहाचे काम उच्च दर्जाचे होण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने आवश्यक खबरदारी घ्यावी, असे उपमुख्यमंत्री श्री. पवार म्हणाले. वैद्यकीय महाविद्यालयाच्या शंभर एकर क्षेत्रामध्ये मोकळ्या जागेत वृक्ष लागवड करावी, तसेच सांडपाणी प्रक्रिया केंद्र उभारावे. महाविद्यालय व रुग्णालयात, तसेच अधिकारी, कर्मचारी निवासस्थाने, वसतिगृहातील सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पाणी वृक्ष लागवडीसाठी वापरावे. भौगोलिक परिस्थितीचा विचार करून परिसरात रुग्णांसाठी चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करावा, असे त्यांनी सांगितले.

वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांनी प्रारंभी महाविद्यालय व रुग्णालयात उपलब्ध असलेल्या सुविधा, तसेच नव्याने आवश्यक सुविधांची माहिती दिली. उपस्थित लोकप्रतिनिधींनी यावेळी आपल्या सूचना मांडल्या.

### बीड मतदारसंघातील महत्वकांक्षी कामांना

बीड शहरात सेंटर फॉर इनोव्हेशन च्या उभारणीबाबत टाटा टेक्नॉलॉजी, पुणे यांनी संमती दर्शवली आहे. त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात यावी.

शहरातील विद्यार्थी, विज्ञान व संशोधन प्रेमी तसेच नागरिकांसाठी सायन्स पार्क आणि तारांगण प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

जिल्हा रुग्णालय, बीड येथे शहरी व ग्रामीण भागातील रुग्णांसाठी महत्वाच्या सुविधा करिता भरीव निधीला मान्यता देण्यात आली.

बिंदुसरा प्रकल्प तसेच

बीड मतदार संघातून जाणार्या बिंदुसरा नदी पात्रात स्वच्छता व सुशोभीकरण कामे होणार आहेत.

जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे सिंथेटिक ट्रॅक व विविध क्रीडा सुविधा निर्माण करण्याची मागणी केली.

बीड जिल्हा ग्रंथालय इमारत बांधकाम करण्यासाठी रोल मॉडेल तयार करण्याचे सुचविले.

बीड शहरातील खुले भूखंड व उद्यान विकसित करण्यात येणार आहेत. शहरातील महत्त्वाचे डीपी रस्ते निर्माण करण्यात येणार आहेत. शहरातील महत्त्वाच्या चौकांचे सुशोभीकरण करण्यात येणार आहे. घनकचरा व्यवस्थापन व पाणी व्यवस्थापन करण्यात येणार आहे.

बीड मतदार संघातील पर्यटनाचे स्थळ असलेले युवा शांतीवन व सह्याद्री देवराई या ठिकाणी वन विभागामार्फत विविध विकासकामे करण्यात येणार आहेत.

# केंद्रीय गृहमंत्रालयाचे राज्यांना महत्त्वाचे निर्देश; अवैध घुसखोरांवर ३० दिवसांच्या आत कारवाई करा





**नवी दिल्ली । वृत्तसेवा**

भारत-पाकिस्तान तणावानंतर केंद्रीय गृहमंत्रालयाने ॲक्शन मोडवर आले असून बांगलादेशी व रोहिंग्या घुसखोरां (खश्रश्रशसरश्र खपषळश्रींीरींी)विरुध्द कडक कारवाई करण्यात येत आहे. अवैध घुसखोरांची ओळख पटविण्याकरिता आणि त्यांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्यासाठी गृहमंत्रालयाने राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना ३० दिवसांची मुदत दिली आहे.

दरम्यान, सर्व राज्यांनी घुसखोरांची ओळख पटविण्यासाठी त्यांच्या वैधानिक अधिकारांचा वापर करत पडताळणीनंतर हद्दपारीची प्रक्रिया सुरू करावी, असे निर्देश केंद्रीय गृहमंत्रालयाकडून जारी करण्यात आले आहे.

केंद्रीय गृहमंत्रालयाने प्रत्येक राज्याला जिल्हा पातळीवर पुरेशी डिटेन्शन सेंटर्स स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. या डिटेन्शन सेंटर्समध्ये संशयित स्थलांतरितांना हद्दपारीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ठेवण्यात येणार असून भविष्यात कुठल्याही प्रकारची फसवणूक करू नये म्हणून बायोमेट्रिक माहिती देखील त्यांच्याकडून घेतली जाणार आहे. विशेष म्हणजे सीमा सुरक्षा दल(बीएसएफ) आणि आसाम रायफल्स यांसारख्या सुरक्षा दलांनाही लक्ष ठेवण्यासाठी या प्रकियेत सहभागी केले जाणार आहे.

अवैध बांगलादेशी आणि रोहिंग्या घुसखोरां वर केंद्रीय गृहमंत्रालयाकडून कडक कारवाई करण्यात येणार असून ३० दिवसांच्या आता ओळख पटवून संशियतांचे कागदपत्रे तपासत देशाबाहेर हाकलून द्या, अशा सूचना केंद्रीय गृहमंत्रालयाकडून राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना देण्यात आल्या आहेत. घुसखोर असल्याचा संशय असलेल्यांची कागदपत्रे ३० दिवसांच्या आत पडताळून पहावीत, असे केंद्रीय गृहमंत्रालयाने म्हटले आहे. त्याचबरोबर, जर एखादी व्यक्ती भारतीय नागरिक असल्याचा दावा करत असेल तर त्याची ओळख आणि पार्श्वभूमी माहिती गोळा करण्याची जबाबदारी संबंधित राज्य सरकारची असेल.

**केंद्रीय गृहमंत्रालयाकडून ओव्हरसीज सिटीझन ऑफ इंडिया(ओसीआय) पोर्टलचे उद्घाटन**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नवी दिल्ली येथे नवीन ओव्हरसीज सिटीझन ऑफ इंडिया (ओसीआय) पोर्टलचे उद्घाटन केले. गेल्या दशकातील महत्त्वपूर्ण तांत्रिक प्रगती आणि ओसीआय कार्डधारकांकडून मिळालेल्या अभिप्रायाच्या पार्श्वभूमीवर कमतरता दूर करण्यासाठी आणि वापरकर्त्यांचा अनुभव वाढविण्यासाठी एक नवीन ओसीआय पोर्टल विकसित करण्यात आले आहे.

## ईडी-एनआयएने सर्व युट्यूबर्स, मीडिया इन्फ्लुएंसर आणि फेसबुक पत्रकारांची चौकशी करावी; ज्योती मल्होत्राप्रकरणावर निशिकांत दुबे यांची मोठी मागणी!

मुंबई । प्रतिनिधी

हरियाणा राज्यातील युट्यूबर ज्योती मल्होत्रा हिला देशातील संवेदनशील माहिती पाकड्यांना पुरवल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी तिला १७ मे रोजी अटक केली. न्यायालयाने तिला ५ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. पाकिस्तान अधिकाऱ्यांनी ती संवेदनशील माहिती पुरवत होती आणि पाकसाठी हेरगिरी करत असल्याची माहिती समोर आली आहे.

ज्योती मल्होत्राच्या अटकेनंतर भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी सोमवारी ट्विट करत मोठी मागणी केली आहे. ईडी, एनआयएने सर्व युट्यूबर्स, फेसबुक पत्रकारांची चौकशी करावी अशी मागणी त्यांनी केली आहे. ट्विट करत निशिकांत दुबे म्हणाले, पाकिस्तानसाठी हेरगिरी करताना पकडलेल्या ज्योती मल्होत्राचे कारनामे लक्षात घेता, एनआयए आणि ईडीने गेल्या ५ वर्षांपासून अशा युट्यूबर्स, मीडिया इन्फ्लुएंसर, फेसबुक पत्रकार, बेरोजगार पत्रकारांचे परदेश दौरे, जाहिराती, बँक खाती, गाड्या, घरे यांची चौकशी करावी ते देखील काही परदेशी शत्रूंसोबत सहकार्य करून अजेंडा चालवत आहेत का? याकडे लक्ष द्यावे. यासोबतच त्यांनी सांगितले की, गेल्या ३ वर्षात भारतीयांनी फक्त युट्यूबवरून २१ हजार कोटी रुपये कमावले आहेत. अशी माहिती निशिकांत दुबे यांनी दिली आहे.

**सोशल मीडिया इन्फ्लुएंसर रडारवर**

पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्या ज्योती मल्होत्राची इलेक्ट्रॉनिक उपकरणे आता सुरक्षा यंत्रणांसाठी महत्त्वाचा पुरावा बनू शकतात. यासंदर्भात, अनेक भारतीय सोशल मीडिया इन्फ्लुएंसर देखील तपास संस्थांच्या रडारवर आले आहेत.

**तीन वेळा पाकिस्तानला, एकदा चीनला आणि अनेक वेळा काश्मीरला गेली**

ज्योतीच्या सांगणायानुसार, जेव्हा ती चीनच्या दौऱ्यावर गेली तेव्हाही तिला व्हीआयपी वागणूक मिळाली. ज्योतीचे वडील हरियाणातील वीज महामंडळातून निवृत्त झाले आहेत. ती त्यांच्यासोबत हिसारमध्ये राहते, पण तिच्या खर्चासाठी त्यांच्याकडून पैसे घेत नाही. युट्यूबमधून मिळणाऱ्या उत्पन्नालाही ती हात लावत नाही. तिच्या प्रवासाचा संपूर्ण खर्च पाकिस्तानी अधिकाऱ्यांनी केला. ती नेहमी विमान किंवा ट्रेनने फर्स्ट क्लासनेच प्रवास करायची आणि फक्त महागड्या हॉटेल्समध्येच राहायची. आतापर्यंत ती तीन वेळा पाकिस्तानला, एकदा चीनला आणि अनेक वेळा काश्मीरला गेली आहे, असं ज्योतीने हिसार गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या चौकशीत सांगितलं.

**ट्रॅव्हल विथ जो**

एवढंच नव्हे तर तिने पाकिस्तानी अधिकाऱ्यांसोबत इंडोनेशिया, थायलंड, दुबई, भूतान, बांगलादेश आणि नेपाळचा प्रवासही केला आहे. तिचा पासपोर्ट २२ ऑक्टोबर २०१८ रोजी बनवण्यात आला होता आणि तो २१ ऑक्टोबर २०२८ पर्यंत वैध असल्याचे तिने पोलिस चौकशीदरम्यान सांगितले. गेल्या तीन वर्षांपासून ती तिच्या ट्रॅव्हल विथ जो या युट्यूब चॅनलसाठी व्हिडिओ बनवण्याच्या नावाखाली देशभर आणि परदेशात फिरत आहे. दिल्लीतील एका शीख गटासोबत दोनदा पाकिस्तानातील करतारपूर साहिब गुरुद्वाराला गेली होती आणि एकदा एकटीच गेली होती असेही ज्योतीने चौकशीदरम्यान उघड केलं.

## ऑल पार्टी डेलिगेशन संसदीय असले पाहिजे-पृथ्वीराज चव्हाण

**मुंबई । प्रतिनिधी**

काँग्रेस नेते आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी आज सोमवारी मुंबई येथील काँग्रेसच्या प्रदेश कार्यालयात केंद्र सरकारच्या धोरणांवर आणि अलीकडील निर्णयांवर अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत. त्यांनी वन नेशन-वन इलेक्शनपासून ईव्हीएम, ऑल पार्टी डेलीगेशन, आशिया कप, पाकिस्तानशी संबंधित जलविवाद अशा सर्व मुद्द्यांवर स्पष्ट प्रतिक्रिया दिली.

पृथ्वीराज चव्हाण म्हणाले कि, देशाने युद्धकाळातही पारदर्शिकता राखली आहे. १९६५ मध्ये नेहरू, १९७१ मध्ये इंदिरा गांधी आणि कारगिल युद्धाच्या वेळी अटल बिहारी वाजपेयी संसदेस नियमित माहिती देत असत. आज पंतप्रधान ना जनतेसमोर येतात, ना प्रेस कॉन्फरन्स घेतात, ना संसदेचे अधिवेशन बोलवतात. भारत



सरकारचे पीओके संदर्भात स्पष्ट धोरण असले पाहिजे, पण ते दिसत नाही.

यापुढे बोलताना माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले कि, 'वन नेशन-वन इलेक्शन'चा फायदा जरी दाखवला जात असला तरी, पण ब्रिटीश संसदीय पद्धतीत कधीही लोकसभा किंवा विधानसभा भंग होऊ शकते. त्यांनी सांगितले, 'मी स्वतः १९९६, १९९८ आणि १९९९ मध्ये तीन वर्षांत तीनदा लोकसभा निवडणुका लढल्या आहेत. याचा अर्थ लोकसभा कोणत्याही वेळी भंग होऊ शकते, आणि त्यानंतर उपलब्ध कार्यकाळासाठी वेगळ्या निवडणुका घ्याव्या लागतील.

तसेच पुढे आरोप करताना ते म्हणाले कि, केंद्र सरकार अमेरिका-प्रणालीप्रमाणे निवडणूक प्रक्रिया भारतात आणण्याचा प्रयत्न करीत आहे, ज्यावर काँग्रेस विरोध करते. यासह त्यांनी ईव्हीएम वर पूर्णपणे बंदी आणण्याची मागणी पुनः केली आणि म्हणाले, 'जगभर ईव्हीएम विरोध होत आहे, परंतु केंद्र सरकार अद्यापही एतच् हटविण्याची भूमिका घेत नाही.

मध्य प्रदेशचे मंत्री विजय शहा यांच्याबाबत बोलताना पृथ्वीराज चव्हाण म्हणाले कि, पीएम मोदींनी मनात आणले तर एका तासात विजय शहा याचे मंत्रीपद काढू शकतात, पण मोदी असं करताना दिसत नाहीत कारण त्यांना त्यांच्या मंत्र्यामध्ये आदिवासी वोट बँक दिसत आहे. पण विजय शहा यांनी ऑपेरेशन सिंदूर मधील भारतीय सेनेच्या कर्नल सोफिया कुरेशी यांच्याबाबत अत्यंत चुकीची प्रतिक्रिया दिली आहे. या प्रकरणावर कोर्टाने ताशेरे ओढले असताना सुद्धा या मंत्र्याला पाठीशी घातले जात आहे हे अत्यंत निंदनीय आहे.

## अवैध वाळूची वाहतूक करताना ट्रॅक्टर पकडला

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन जुना रस्ता येथे ट्रॅक्टरच्या साहाय्याने अवैध वाळूची वाहतूक होत असल्याची माहिती चकलांबा पोलिसांना मिळताच (दि.१८) रविवार रोजी कारवाई करत ५,५३,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून चकलांबा पोलिसात चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन जुना रस्ता येथे ट्रॅक्टरच्या साहाय्याने अवैध वाळूची वाहतूक करताना राजेश बंडू नाटकर (वय २७) रा.राक्षसभुवन ता.गेवराई यांच्यावर चकलांबा पोलिसांनी (दि.१८) रविवार रोजी कारवाई केली यात महिंद्रा ७५७डीआय एक्सपी प्लस कंपनीचे लाल रंगाचे ट्रॅक्टर अंदाजे किंमत ५,००,००० रुपये, हिरव्या रंगाची ट्रॉली अंदाजे किमत ५०,००० रुपये,ट्रॉलीमध्ये एक ब्रास वाळू अंदाजे किंमत ३,००० रुपये असा एकूण ५,५३,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून चकलांबा पोलिस पुढील तपास करत आहेत.

## केकतपांगरी येथे भरदिवसा घरफोडी

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील केकतपांगरी येथे भरदिवसा घराचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी सोन्या,चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम लंपास केल्याची घटना (दि.१०) शनिवार रोजी घडली असून चोरट्यांनी १,०४,४०० रुपयांचा एवज लंपास केल्या प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आहे.

गेवराई तालुक्यातील केकतपांगरी येथील बाबासाहेब अक्रूर राऊत (वय ३६) यांच्या घराचे भरदिवसा अज्ञात चोरट्यांनी कुलूप तोडून घरातील सोन्या,चांदीच्या दागिन्यांसह रोक रक्कम लंपास केल्याची घटना (दि.१०) शनिवार रोजी घडली असून यामध्ये १० ग्रॅमची एक सोन्याची चैन,बदाम अंदाजे किंमत ३५,००० रुपये ,एक ग्रॅम सोन्याच्या दोन नथा अंदाजे किमत १२,००० रुपये ,एक ग्रॅमचे कानातील फुल अंदाजे किंमत ६,००० रुपये,दोन भारचे छडीचे कडे अंदाजे किमत १,४०० रुपये,५०,००० रुपये नगदी असा एकूण १,०४,४०० रुपयांचा एवज लंपास केल्या प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात बाबासाहेब राऊत यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आहे.पुढील तपास गेवराई पोलीस करत आहेत.

## सख्या चुलत्यानेच केला पुतणीवर अत्याचार, आरोपीला मरेपर्यंत आजीवन कारावासची शिक्षा; बीड जिल्हा सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

**बीड । प्रतिनिधी**

पिडीत अल्पवयीन मुलीवर (पुतणीवर) बळजबरीने लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी आष्टी तालुक्यातील रहिवासी असलेला आरोपीस अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश -१ बीड मा. एस. आर पाटील मॅडम यांनी कलम ३७६ (२) (१),३७६ (२) (प),३७६ (३) भादवी व कलम ६ बाल लैंगीक अत्याचारः प्रतिबंध कायदा सन २०१२ अन्वये दोषी ठरवुन कलम ६ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध कायदा सन २०१२ अन्वये आरोपीच्या नैसर्गिक मृत्युपर्यंत आजन्म कारावास व २५,०००/- रूपये दंड तसेच कलम ५०६ भादवी अन्वये ६ महिने साधा कारावास व ५००/- दंड व दंड न भरल्यास १५ दिवसांचा साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

प्रकरणाची थोडक्यात हकीकत अशी की, ऑगस्ट २०२३ मध्ये पिडीतेच्या पोटदुखीच्या आजारावरून डॉक्टराकडे तपासणीसाठी घेउन गेल्यानंतर संबंधीत डॉक्टरांनी पिडीतेस पुढील तपासणीसाठी अहिल्यानगर (अहमदनगर) येथील तज्ञ डॉक्टराकडे पाठविले असता तज्ञ डॉक्टरांच्या तपासणी मधे पिडीता हि ७ महिन्याची गरोदर असल्याचे निर्देशनास आले त्यावरून पिडीतेच्या आईने पिडीता हि १३ वर्षाची अज्ञान बालिका असुन तिचे अज्ञानाचा फायदा घेउन आरोपीने तिच्यावर लैंगिक अत्याचार केला अशा अशयाच्या फिर्यादी दिली. त्यावरून प्रस्तुत प्रकरणातील आरोपी विरूद्ध तोफखाना पो. स्टे अहिल्यानगर येथे गुन्हा नोंद करण्यात आला व सदर गुन्हा हा अंभोरा पो.स्टे ता. आष्टी जि. बीड च्या कार्यक्षेत्रात येत असल्याने सदरील गुन्हा पो.स्टे अंभोरा ता. आष्टी यांच्याकडे तपासासाठी वर्ग करण्यात आला.

सदर तपासादरम्यान फिर्यादी व इतर साक्षीदार व वैद्यकीय पुरावा यावरून प्रस्तुत प्रकरणातील अरोपी विरूद्ध सबळ पुरावा आढळल्याने विशेष सत्र न्यायालय बीड येथे दोषारोप पत्र दाखल करण्यात आले. प्रस्तुत प्रकरणाचा तपास सुरवातीला ए.पी.आय श्री बी.सी. गोसावी, ए.पी.आय श्री डी.बी कोळेकर व त्यांनतर श्रीमती सुरेखा.एस.धस, म.स.पो.नि. अ.मा.वा.प्र. कक्ष यांनी केला.सदर प्रकरणात आरोपी विरूद्ध गुन्हा सिद्ध करण्याकामी पिडीता, फिर्यादी, डॉक्टर, न्यायवैद्यकीय प्रयोगशाळा येथील तज्ञ व इतर एकुण १८ साक्षीदार तपाण्यात आले. सदर प्रकरणात पिडीतेचा पुरावा त्याचबरोबर पिडीतेबाबतचा वैद्यकीय पुरावा व प्रकरणातील डी.एन.ए तपासणी अहवाल व इतर साक्षीदार यांचा पुरावा व सहा. सरकारी वकिल अनिल बी. तिडके यांचा युक्तीवाद ग्राहय धरुन मा. एस. आर पाटील मॅडम अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश १ बीड यांनी प्रस्तुत प्रकरणातील आरोपीस कलम ३७६ (२) (ष), ३७६ (२) (प), ३७६ (३) भादवी व कलम ६ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध कायदा सन २०१२ अन्वये दोषी ठरवुन कलम ६ बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध कायदा सन २०१२ अन्वये आरोपीच्या नैसर्गिक मृत्युपर्यंत आजन्म कारावास व २५,०००/- रूपये दंड तसेच कलम ५०६ भादवी अन्वये ६ महिने साधा कारावास व ५००/- दंड व दंड न भरल्यास १५ दिवसांचा साध्या कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

सदर प्रकरणात सहा. सरकारी वकिल अनिल बी. तिडके व ॲड. अजय दि. राख जिल्हा सरकारी वकिल, बीड यांनी काम पाहिले. त्यांना पैरवी अधिकारी पोलिस हवालदार ११४ बी बी. शिंदे तसेच अंभोरा पोलिस स्टेशनच्या महिला पोलिस कर्मचारी एस. आर जेव्हे यांनी सहकार्य केले.

## मुंबई-गोवा महामार्गाला आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांचं नाव द्या-एस.एम.देशमुख यांची मागणी

सिंधुदुर्ग । प्रतिनिधी

मुंबई-गोवा महामार्गाला आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांचं नाव द्यावं अशी मागणी अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी केली आहे..ङ्गदर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या १७९ व्या पुण्यतिथी निमित्त ओरस येथील बाळशास्त्री जांभेकर स्मारकात आयोजित अभिवादन सभेत एस.एम.देशमुख बोलत होते. अध्यक्षस्थानी पालकमंत्री नितेश राणे होते.



एस.एम. म्हणाले, मुंबई-गोवा महामार्ग व्हावा यासाठी पत्रकारांनी २००५ रोजी वडखळ येथे पहिले आंदोलन केले..त्यानंतर रस्त्यावर उतरून सतत त्याचा पाठपुरावा केला.. त्यामुळे २०१२ मध्ये रस्त्याचे काम सुरू झाले मात्र विविध कारणांनी ते १२ वर्षे रखडले.. त्यानंतरही काम लवकर व्हावे यासाठी कोकणातील पत्रकार आंदोलन करीत राहिले.. केवळ पत्रकारांचा लढा आणि १७ वर्षे सलग पाठपुरावा केल्याने हे काम मार्गी लागत आहे.. पत्रकारांचा लढ्यामुळे हा मार्ग होत असलयाने महामार्गाला एका पत्रकाराचे नाव देणे औचित्यपूर्ण ठरेल. बाळशास्त्री जांभेकर हे केवळ पत्रकार नव्हते, ते विचारवंत होते, शिक्षक होते, भाषा प्रभू होते, सामाजिक कार्यकर्ते होते, आणि ते कोकणातले होते.. त्यामुळे महामार्गाला त्यांचे नाव देऊन उचीत स्मारक करावे अशी मागणी देशमुख यांनी केली.

परदेशात साहित्यिक, विचारवंत, पत्रकारांचे पुतळे आहेत, त्यांची नावं रस्त्यांना आहेत. आपल्याकडे फक्त नेत्यांची किंवा त्यांच्या आई वडिलांची नावं रस्त्यांना देण्याची पध्दत आहे. या महामार्गाला बाळशास्त्री जांभेकर यांचं नाव देऊन सरकारनं एक नवा पायंडा पाडावा अशी सूचना एस.एम.देशमुख यांनी केली.. हिंदीचे आद्य पत्रकार बाबूराव पराडकर देखील कोकणातील पराडगावचे तेथे त्यांचेही स्मारक व्हावे अशी मागणीही देशमुख यांनी केली.

आपल्या भाषणात नितेश राणे यांनी देशमुख यांच्या मागण्यांच्या सोडवणुकीसाठी आपण प्रयत्न करू असे आश्वासन दिले असले तरी महामार्गाला बाळशास्त्री जांभेकर यांचं नाव देण्याच्या मागणीवर त्यांनी सोयीस्कर मौन बाळगले. अभिवादन सभेसाठी राज्यभरातून परिषदेचे १०० पदाधिकारी उपस्थित होते

## राष्ट्रवादी काँग्रेसमधील नेतृत्वात लवकरच बदल दिसेल; रोहित पवारांचं विधान

कोल्हापूर । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेसशरद पवार गटात सर्व काही आलबेल नाही अशा बातम्या येत आहेत, मात्र त्यात काही तथ्य नाही. शरद पवार, जयंत पाटील आणि सुप्रिया सुळे हे लवकरच काही निर्णय घेणार आहेत. त्यामुळे पुढच्या काही दिवसांत या पक्षातील नेत्यांच्या नेतृत्वात बदल दिसतील, असे विधान आमदार रोहित पवार यांनी केले.

आमदार रोहित पवार म्हणाले, ईडीने आजपर्यंत जे आरोप केले आहेत, त्यातील ९९ टक्के आरोप हे खरे नव्हते. या कायद्यामध्ये चांगले बदल होत असतील, तर स्वागतच आहे. विरोधी पक्षांनी जनतेसाठी एखादी चुकीची गोष्ट होत असेल तर रस्त्यावर उतरायला हवे, मात्र तसे होताना दिसत नाही.

**पालकमंत्रिपदाचा विषय २०२९ मध्ये सुटेल**

रायगड आणि नाशिकमधील पालकमंत्रिपदाचा विषय २०२९ मध्ये सुटेल. नाशिकमध्ये कुंभमेळा होणार आहे, त्यामुळे पालकमंत्रिपदाची जबाबदारी मुख्यमंत्री स्वत:कडे घेतील असे वाटते. बीडमध्ये पालकमंत्री म्हणून अजित पवार यांचा वचक कमी पडत आहे, अशी टीका त्यांनी महायुती सरकारच्या कारभारावर केली.

अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीबाबत शेतकऱ्यांना मदत करण्याऐवजी सत्तेतील नेते गोकुळमध्ये राजकारण करत आहेत. कृषिमंत्री कुठेच दिसत नाहीत, त्यांना या अधिवेशनात शोधून काढू, असा इशारा रोहित पवारांनी माणिकराव कोकाटेंना दिला.

## सरन्यायाधीश भूषण गवईंचा प्रोटोकॉल न पाळून भाजपा युती सरकारकडून अपमान, आंबेडकरी विचारांचे असल्याने अपमान केला का?-नाना पटोले

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे सुपुत्र भूषण गवई सरन्यायाधीश झाल्याने अख्या महाराष्ट्राला त्यांचा अभिमान आहे पण आपल्याच सुपुत्राचा अपमान राज्यातील भाजपा युती सरकार व अधिकाऱ्यांनी केला आहे. सरन्याधीशांसाठी असलेला प्रोटोकॉल न पाळून त्यांचा अपमान केला. हे देश व राज्याला सहन न होणारे आहे, सरन्यायाधिशांचा प्रोटोकॉल न पाळून अपमान करणाऱ्या अधिकाऱ्यांवर सरकार काय कारवाई करणार आहे?, असा प्रश्न काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नाना पटोले यांनी विचारला आहे.

यासंदर्भात प्रसारमाध्यमांशी बोलताना नाना पटोले म्हणाले की, राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान, लोकसभेचे अध्यक्ष सरन्यायाधीश, यांचा एक विशेष प्रोटोकॉल असतो, त्यांच्या दौऱ्याची माहिती आधिच दिलेली असते पण आम्हाला माहिती नव्हती असे अधिकारी सांगत आहेत हे पटणारे नाही. सरन्यायाधिशांचा प्रोटोकॉल न



पाळून भाजपा युता सरकारन महाराष्ट्राची अब्रु वेशीवर टांगली आहे. सरन्यायाधीश त्यावर गमतीने बोलले, पण तो प्रशासनाला इशारा आहे तो सरकारला कळला नसेल. सरन्यायाधीश गवई हे आंबेडकरी आहेत म्हणून त्यांच्या महाराष्ट्रात अपमान केला आहे का? का मुख्यमंत्र्यांनी तसे आदेश दिले होते? हे समजले पाहिजे. शिव, शाहू, फुले आंबेकरांच्या राज्यातून एक आंबेडकरी विचाराचा व्यक्ती सरन्यायाधीश झाला त्याचा आनंद आहे. विशेष म्हणजे सरकारमध्ये अनुभवी मुख्यमंत्री व दोन उपमुख्यमंत्री आहेत त्यांनाही याचे गांभिर्य नाही का? असेही नाना पटोले म्हणाले.

राज्य सरकार सर्वधर्म समभाव मानत असेल तर महान समाजसुधारक महात्मा ज्योतीबा फुले यांच्या जीवनावरील 'फुले' चित्रपट राज्यात टॅक्स फ्री करावा अशी मागणीही नाना पटोले यांनी केली. या आधी सरकारने राज्यात अनेक चित्रपट टॅक्स फ्री केले आहेत पण फुले यांच्या जीवनावरील चित्रपटाबाबत वेगळी भूमिका का? असा सवाल नाना पटोले यांनी उपस्थित केला.

# श्रीक्षेत्र परळी वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकासासाठी सर्वोतोपरी सहकार्य

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून श्री क्षेत्र परळी वैद्यनाथ ज्योर्तिलिंग तीर्थक्षेत्र विकास कामांचा आढावा

परळी । प्रतिनिधी

श्रीक्षेत्र परळी वैद्यनाथ ज्योर्तिलिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करणार असल्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी आज सांगितले. विकास आराखड्यातील कामांसाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही मात्र कामे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण झाली पाहिजेत असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

उपमुख्यमंत्री श्री.पवार यांनी आज परळी येथे प्रभु वैद्यनाथचे दर्शन घेतले. त्यानंतर परळी येथील शासकीय विश्रामगृहातील सभागृहात त्यांनी श्रीक्षेत्र परळी वैद्यनाथ ज्योर्तिलिंग तीर्थक्षेत्र विकास आराखड्या अंतर्गत सुरू असलेल्या कामांचा आढावा घेतला. यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार विक्रम काळे, आमदार धनंजय मुंढे, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी श्री क्षेत्र परळी येथील तीर्थक्षेत्र विकास आराखड्यामध्ये ९२ कामांना नव्याने प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचे सांगितले. यावेळी आराखड्यानुसार करण्यात येणाऱ्या



कामांचे सादरीकरण करण्यात आले. तीर्थक्षेत्र विकास आराखड्यात २८६.६८ कोटीच्या विविध ९२ कामांना मान्यता दिल्याचे त्यांनी सांगितले.

दर्शन मंडपाचे काम, परिसर सुधारणा, मंदिरा भोवती दगडी फरशी, वास्तुशिल्प प्रवेशद्वार, अंतर्गत विद्युतीकरण, सौर दिवे बसविणे, उद्यान विकसित करणे, संरक्षण भिंतीचे बांधकाम, वाहनतळ यासह सुरू असलेल्या विकास कामांबाबत मुख्य वास्तुविशारद कृष्णकुमार बांगड यांनी माहिती दिली.

उपमुख्यमंत्री श्री.पवार म्हणाले, श्रीक्षेत्र परळी वैद्यनाथ हे बारा ज्योर्तिलिंगापैकी एक आहे. प्रभु वैद्यनाथाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी विकास आराखड्यातील कामेही दर्जेदार होणे अत्यंत आवश्यक आहे. कामाच्या गुणवत्तेबाबत प्रत्येकाने बारकाईने लक्ष घालणे आवश्यक आहे. मंदिर परिसरातील स्वच्छता, निटनेटके पणा, सर्व सोई सुविधांयुक्त दर्शन मंडप, तसेच तीर्थक्षेत्र बालाजी, शिर्डी तसेच पंढरपूरच्या धर्तीवर भविष्यात भाविकांना सर्व सोईसुविधा देण्यासाठी राज्य शासनाकडून यासाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. राज्य शासन सर्वोतोपरी सहकार्य करेल, असे त्यांनी सांगितले.

मंदिराच्या मागील बाजूच्या जागेवर लाईट आणि साऊंड शो करण्यात येणार आहे. लेझर शो करताना किती वेळ शो असेल, त्यामध्ये भाविकांना कोणत्या बाबी दाखविल्या जातील यासह देण्यात येणाऱ्या सेवा सुविधा दर्जेदार असायला हव्यात असे त्यांनी आवर्जून सांगितले.


यावेळी उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसिलदार व्यंकटेश मुंढे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे आदी विकसीत होते.

# कुठलाच पात्र लाभार्थी घरकुल सर्व्हेपासून वंचित राहू नये; प्रशासनाला खबरदारी घेण्याच्या आ.संदीप क्षीरसागरांकडून सूचना

बीड । प्रतिनिधी

प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या सेल्फ सर्व्हे ला ३१ मे २०२५ पर्यंत मुदतवाढ मिळालेली आहे. परंतु ग्रामीण भागातील अनेक लाभार्थ्यांकडे स्मार्टफोन नसल्यामुळे सेल्फ सर्व्हे करण्यासाठी अडचण येत आहे. त्यामुळे कुठलाही लाभार्थी सर्व्हेपासून वंचित राहू नये यासाठी प्रशासनाने सर्व ग्रामसेवकांना कडक सूचना द्याव्यात, असे निर्देश आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला दिले आहेत.

ग्रामीण भागातील पात्र नागरिकांना घरकुल योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत मोबाइलद्वारे सेल्फ सर्व्हे करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे.



तांत्रिक अडचणींमुळे आणि विलंबामुळे कोणताही पात्र लाभार्थी या योजनेपासून वंचित राहू नये याकरिता सेल्फ सर्व्हे करण्यासाठी प्रशासनाकडून मुदतवाढही देण्यात आली आहे. परंतु ग्रामीण भागातील अनेक पात्र लाभार्थी हे अशिक्षित आहेत तसेच अनेकांकडे स्मार्टफोन नाहीत, आणि अनेकांना तांत्रिक माहिती नसल्यामुळे सेल्फ सर्व्हे करण्यासाठी अडचणी येत आहेत. या बाबींचा विचार करून गावपातळीवर, ज्या पात्र लाभार्थींना सेल्फ सर्व्हेबाबत अडचणी आहेत त्या लाभार्थींचा सर्व्हे ग्रामसेवकांनी करून द्यावा. एकही पात्र लाभार्थी सेल्फ सर्व्हेपासून वंचित राहू नये याची खबरदारी घेण्याचे कडक निर्देश ग्रामसेवकांना द्यावेत. अशा सूचना आ.संदीप क्षीरसागर यांनी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक, गटविकास अधिकारी बीड व शिरूर (का.) यांना दिल्या आहेत.

# संग्राह्य असे बीड कॉफी टेबल बुक-अजित पवार

## नियोजन समितीच्या बैठकीत झाले विमोचन



**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याची सचित्र आणि उत्तम अशी मांडणी कॉफी टेबल बुकच्या माध्यमातून करण्यात आली आहे. हे पुस्तक कुणालाही आपल्या संग्रही ठेवावे असे वाटेल असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी बीड या पुस्तकाच्या विमोचन प्रसंगी केले.

बीड जिल्हा माहिती कार्यालयातर्फे नियोजन निधीतून हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले आहे जिल्हा नियोजन समितीच्या आज झालेल्या बैठकीत हा विमोचन सोहळा पार पडला.

यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार विक्रम काळे, आमदार सतीश चव्हाण, आमदार सुरेश धस, आमदार प्रकाश सोळंके, आमदार धनंजय मुंडे आमदार नमिता मुंदडा, आमदार विजयसिंह पंडित उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जिवने तसेच पोलीस अधिक्षक नवनीत कॉवत यांची प्रमुख उपस्थिती होती.

# शेतकऱ्यांनी डीएपी खतास पर्यायी खते वापरावी

**बीड । प्रतिनिधी**

शेतकरी बंधूनी डिएपी (उळ--ोपळीा झहेीहिरींश) खतास पर्यायी खते वापरावीत महाराष्ट्र राज्य हे मृद परिक्षण व जमिन आरोग्य पत्रिकांचे आधारे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन प्रणाली वापराकरीता अग्रेसर आहे. राज्यामध्ये सद्या पेरणीला सुरुवात झाली असून डिएपी खताची शेक-यांकडून जास्त मागणी आहे. डिएपी (Diaammonium Phosphate) खता मध्ये १८ ट्क्के नत्र तर ४६ टक्के स्फुरद ही अन्नद्रव्य आहेत.

डिएपी खताची कमतरता भरुन काढण्यासाठी पर्यायी खत वापरणे गरजेचे आहे. स्फुरद युक्त खतामध्ये डीएपी खतानंतर एसएसपी (Single Super Phosphate) या खताची सर्वाधिक मागणी आहे. एसएसपी खत हे देशातंर्गत तयार होत असून यामध्ये स्फुरद-१६ ट्क्के सह सल्फर व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये आढळून येतात.

सल्फर अन्नद्रव्यामूळे तेलबिया पिकांमध्ये एसएसपी खताचा वापर फायदेशीर ठरणार आहे. डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व एसएसपी तीन गोणी खतांचा वापर डिएपीस चांगला पर्याय आहे. एसएसपी बरोबरच संयुक्त खते जसे की एनपीके-१०:२६:२६, एनपीके-०९:२४:२४, एनपीके-०८:२१:२१, एनपीके-२०:२०:०:१३, एनपीके-१२:३२:१६ एनपीके १४:३५:१४ व एनपीके-१५:१५:१५ या खतांच्या वापरामुळे नत्र व स्फुरद बरोबरच पालाश हे अन्नद्रव्य सुध्दा पिकांना उपलब्ध होते. त्यामुळे या संयुक्त खतांचा वापर केल्यास पिकांसाठी पोषक ठरतो.त्याच बरोबर टिएसपी (Tripple Super Phosphate) या खता मध्ये ४६ टक्के स्फुरद अन्नद्रव्याचो मात्रा असुन डिएपी खताच्या एका गोणी ऐवजी युरिया अर्धी गोणी व टिएसपी एक गोणी खतांचा वापर केल्यास तो देखिल डिएपी खतास उत्तम पर्याय आहे. चालू खरिप हंगामा मध्ये शेतक-यांनी केवळ डिएपी खतावरच अवलंबून न राहता बाजार मध्ये उपलब्ध असलेल्या पर्यायी खतांचा वापर करण्याचे आवाहन कृषी विभागाकडून सर्व शेतक-यानां करण्यात आले आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतले प्रभु वैद्यनाथाचे दर्शन




परळी । प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज बारा ज्योर्तिलिंगापैकी एक असलेल्या प्रभू वैद्यनाथाचे दर्शन घेऊन विधिवत पूजा केली. तसेच मंदिर परिसरात सुरू असलेल्या विकास आराखड्यातील कामांची पाहणीही त्यांनी केली.

यावेळी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार विक्रम काळे, आमदार धनंजय मुंडे, उपमुख्यमंत्री कार्यालयाचे सचिव राजेश देशमुख, बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, आदी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री पवार यांच्या हस्ते यावेळी अभिषेक करण्यात आला. मंदिर देवस्थानच्या वतीने उपमुख्यमंत्री पवार, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे तसेच लोकप्रतिनिधी यांचा सत्कार करण्यात आला.

# परळी औष्णिक विद्युत केंद्राचा उपमुख्यमंत्र्यांकडून आढावा



परळी । प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी आज परळी औष्णिक विद्युत केंद्रा अंतर्गत सुरू असलेल्या कामकाजाचा आढावा घेतला.

शासकीय विश्रामगृह येथे आयोजित आढावा बैठकीला पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, आमदार विक्रम काळे, आमदार धनंजय मुंढे आदी उपस्थित होते.

यावेळी औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता सुनील इंगळे यांनी सादरीकरणाद्वारे औष्णिक विद्युत केंद्राबाबत माहिती दिली. यामध्ये प्रस्तावित संच क्रमांक-१ ची मंजुरी व उभारणी, सौर ऊर्जा प्रकल्प मान्यता, राखेचे प्रदूषण व उपाययोजना, औष्णिक विद्युत केंद्राच्या विश्रामगृहाचे नुतनीकरण, थर्मल परिसरात स्वतंत्र पोलीस ठाणे, थर्मल कॉलनी परिसरात वृक्ष लागवड, सौर ऊर्जा प्रकल्प, आदी विषयांबाबत आढावा घेण्यात आला. परळी औष्णिक विद्युत केंद्राबाबत असलेल्या अडचणी सोडविण्यासाठी आपले सहकार्य असेल असे श्री.पवार यांनी सांगितले.

यावेळी उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसिलदार व्यंकटेश मुंढे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी त्रिंबक कांबळे आदी विकसीत होते.

# शैक्षणिक कर्जासाठी लागणारे जामीनदाराची अट रद्द करण्याची मागणी

## मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे संचालक शेख तय्यब यांनी घेतली अजित पवारांची भेट

**बीड । प्रतिनिधी**

मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळ अल्पसंख्याक समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक आणि मागासपण दूर करण्याच्या हेतुने काम करत आहे. परंतु गरजू विद्यार्थ्यांसाठी जी शैक्षणिक कर्ज योजना राबवली जाते त्या योजनेची नियमावली गोरगरीब विद्यार्थ्यांना थेट कर्ज मिळवून देण्यात अडचणीची ठरू पाहात आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या अल्पसंख्यांक समाजाकडे स्थावर मालमत्ता अथवा जंगम मालमत्ता उपलब्ध नसते. परंतु विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज जेव्हा घ्यायचे असते ते व्हा त्यांच्याकडे जामीन देण्यासाठी कुठलीच मालमत्ता नसते. त्यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज मिळत नाही. विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी या योजनेला लागणारे मालमत्ताधारक व नोकरदार जामीनदार ही अट रद्द करावी, अशा आशयाची मागणी एका निवेदनाद्वारे मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाचे संचालक तथा सायं. दैनिक बीड रिपोर्टरचे संपादक शेख तय्यब यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे. या वेळी शेख तय्यब यांनी गेल्या सहा महिन्यांच्या आपल्या कामाचा अहवालही उपमुख्यमंत्र्यांना सादर केला.

उपमुख्यमंत्री अजित पवार आज बीड जिल्हा दौर्यावर आहेत. परळी येथे कार्यक्रमाच्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री अजितदादा हे आले असता मौलाना आझाद आर्थिक विकास महमंडळाचे संचालक शेख तय्यब यांनी त्यांची भेट घेऊन अल्पसंख्याक समाजातील लोकांच्या अडीअडचणींवर चर्चा केली. या वेळी शेख तय्यब यांनी गेल्या सहा महिन्यांचा आपल्या कामाचा अहवालही उपमुख्यमंत्र्यांना सादर केला. संचालकपदी नियुक्ती झाल्यानंतर शेख तय्यब यांनी राज्यभर दौरा केला होता. जिल्हानिहाय जात तेथील अल्पसंख्याक समाजातील लोकांच्या आणि विद्यार्थ्यांच्या भेटीगाठी घेतल्या होत्या. त्यांच्या अडीअडचणी समजून घेतल्या होत्या. तोच अहवाल आज सादर केला. या वेळी दिलेल्या निवेदनात अजित पवार यांना दिलेल्या निवेदनात शेख तय्यब यांनी म्हटले,



मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळ अंतर्गत अल्पसंख्यांक समाजाच्या आर्थिक, शैक्षणिक, मागासपण दूर करण्याहेतू

आजपावेत काम करत आले आहेत. गरजू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक कर्ज योजना राबविण्यात येत आहे. परंतु या योजनेसाठी जी नियमावली आहे ती अल्पसंख्यांक समाजातील गोर-गरीब, विद्यार्थ्यांसाठी अडचणीची ठरू पाहत आहे. आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांकडे स्थावर मालमत्ता, जंगल मालमत्ता अथवा अन्य कुठलेही साधन जामीन देण्यासाठी त्यांच्याकडे उपलब्ध नाही. परिणामी विद्यार्थ्यांना जेव्हा शैक्षणिक कर्ज घ्याव्याचे असते तेव्हा केवळ जामीन देण्यासाठी त्यांच्याकडे कुठलीच मालमत्ता नसल्याने ते शैक्षणिक कर्जापासून वंचित राहतात.

मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना ही अल्पसंख्यांक समाजातील गरीबांना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक दृष्टया मागासपण दुर करण्याच्या उदात हेतुतून झाली आहे. राज्य शासनाने या महामंडळाच्या अंतर्गत अनेक कामे हाती घेतलेली आहे. त्यामध्ये प्रामुख्याने गरीब विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्ज देणे होय. केवळ गरीब विद्यार्थ्यांना जामीनीसाठी काही उपलब्ध नाही म्हणून महामंडळाचा आणि विद्यार्थ्यांचा हेतू साध्य होत नाही. त्यासाठी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कर्जाबाबत ज्या काही अटी महामंडळाने आखल्या आहेत. त्या रद्द करून विद्यार्थ्यांच्या सिबीलवर कर्जदारा विद्यार्थ्यांचे नाव टाकण्यात यावे अथवा त्यांच्याकडून लिखित बॉन्ड करून घ्यावा. आत्ताच केंद्र सरकारने नव उद्योग करणार्यांसाठी कर्ज योजना वाढवली आहे. त्यामध्ये नवउद्योग करणार्या उमद्या तरूणाला कर्ज देतांना त्या कर्जाची जिम्मेदारी थेट केंद्रसरकाने घेतली आहे. त्या धर्तीवर अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी कर्ज देतांना महामंडळाला शासन त्यांच्या कर्जाची जबाबदारी घेता येईल का या बाबतही विचार व्हावा विद्यार्थ्यांना कर्ज देतांना जामीनदारांचे जी अट ठेवण्यात आली आहे ती रद्द करण्यात यावी, असे म्हणत महामंडळाने असे क्रांतीकारी निर्णय घेतल्यास अल्पसंख्यांक समाजातील गोर गरीब विद्यार्थ्यांची उन्नतीबरोबर शैक्षणिक, आर्थिक आणि सामाजिक मागासपण दुर होण्यास मदत होईल.

हे पत्रक, मुद्रक व प्रकाशक विलास दिगंबरराव डोळसे यांनी कल्पना अक्षर मुद्रणालय पाटोदा (४१४२०४) जि.बीड येथे छापून सायं. दै. पाटोदा संचार कार्यालय, बसस्टॅण्डसमोर पाटोदा जि. बीड येथे प्रसिध्द केले. (संपादक- विलास डोळसे) मोबा.९४२३४७१८३३ (बीड न्याय कक्षेत)

“Printed by Vilas Digambarrao Dolse, Published byVilas Digambarrao Dolse, on behalf of Vilas Digambarrao Dolse, and Printed at Kalpana Akshar Mudranalaya Patoda (414204), Dist. Beed. and published from Eveing Daily Patoda Sanchar in front of Bus Stand, Patoda Dist. Beed Editor Vilas Dolse,(Beed Justice)